संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

## विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज भरण्याच्या तारखेत वाढ
## १७ डिसेंबरपर्यंत करता येईल ऑनलाईन अर्ज सादर

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरात असलेल्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झालेली आहे. विद्यापीठ संकेतस्थळावर प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरीता दि. १७ नोव्हेंबरपासून सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. विद्यापीठाच्या केंद्रीय प्रवेश समितीद्वारे प्रवेशाकरीता अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख दि. १७ डिसेंबर, २०२० ठेवण्यात आली असून विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून पोस्टाद्वारे किंवा स्वतः अध्यक्ष, केंद्रीय प्रवेश समिती, विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती या ठिकाणी दि. १८ डिसेंबर, २०२० रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत जमा केलेल्या रकमेच्या पावतीसह सादर करावयाची आहे.

प्रवेश प्रक्रियेविषयाच्या वेळापत्रकातील तपशीलवार बदल व सविस्तर माहिती www.admission.sgbau.ac.in या संकेतस्थळावर दिलेली आहे. अधिक माहितीकरीता केंद्रीय प्रवेश समितीचे अध्यक्ष डॉ. प्रशांत ठाकरे यांचेशी कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी क्र. ९८२२२२२८२२ यावर संपर्क साधता येईल. तरी ज्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ परिसरातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घ्यावयाचा आहे, त्यांनी ऑनलाईन अर्ज विहित शुल्कासह सादर करावेत, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०९/११/२०२०.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी